भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.३२५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०५/२०१७

१) मोटार सायकलची चोरी . :–

दिनांक ११/०५/२०१७ चे १३.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हैदर अहमद अली वय ५१ वर्ष, रा. जुनीहटरी राजनांदगाव मज्जीद के. पास (छ.ग.) वरुन भंडारा येथे आपले मित्राकडे आले असता त्यांनी आपली मोटार सायकल क्र. सीजी ०८ एए ३४१९ किंमती ६०,०००/–रु. ची मित्राचे घराचे जवळ ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

२) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे पायी जाणाऱ्या इसमास धडक देवनु जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ११/०५/२०१७ चे ०७.३० वा. दरम्यान यातील मृतक ज्ञानेश्वर राजाराम कोंटागले वय ८० वर्ष रा. राहाटगाव हे संडास करुन एनएच ०६ रोड ने घरी येत असतांना लाखनी कडुन भंडारा कडे येणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, निष्काळजीपने चालवुन वरील मृतक यास धारगाव एनएच ०६ रोड येथे धडक मारुन जखमी करुन त्याचे मरणास व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. कारधा येथे कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मेश्राम पो. स्टे. कारधा हे करीत आहेत.

३) अज्ञात मोटार सायकलच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकलला धडक दिल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–

दिनांक १०/०५/२०१७ चे २०.०० वा. दरम्यान यातील मृतक गिरीधर नामदेव ठेंगरी वय ३५ वर्ष रा. मालडोंगरी जि. चंद्रपुर हा आपले मोटार सायकल ने आसोला कुडेगाव येथे जात असतांना परसोडी नाग शेतशिवरा जवळ यातील अज्ञात आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने निष्काळजीपणे चालवुन मृतकचे मोटार सायकलला धडक मारल्याने डोक्याला मार लागुन मोटार सायकल सह खाली पडल्याने त्यास औषधोपचारा करीता ग्रा. रु. लाखांदुर येथे आनले असता तेथील डॉ. नी तपासुन मरण पावल्याचे घोषीत केल्याने फिर्यादी सुधाकर वासुदेव राऊत वय २३ वर्ष, रा. कुडेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. लाखांदुर येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. मुजंमकर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

४) विहीरीचे पाण्यात बुडुन महीलेचा मृत्यु . :–

दिनांक ११/०५/२०१७ चे ०९.०० ते ११.०० वा दरम्यान यातील फिर्यादीची मोठी आई मृतक सौ. जाईबाई किसनजी बाळबुधे वय ६५ वर्ष रा. नेरी गावाचे ग्रामपंचायत येथील सरकारी विहीरीतील पाण्यात मृतक ही तरंगतांनी मृताअवस्थेत दिसुन आल्याने फिर्यादी मनोज कुमार किसनजी बाळबुधे वय २७ वर्ष, रा. नेरी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. कारंडे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ११/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०६, तीन सिटर वाहनांवरती ३२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.